किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५१/२०१४
गजानन ..वि.. रमेश
नि.क्र. २५ चा भाग...

<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.०२ दिपक गजानन बोचरेचा उलट तपास गैरअर्जदारांकरीता विधिज्ञ श्री. एम.ए. मानकर यांचेतर्फे–</u>

०५. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत या माझ्या वडील व काकांनी विकत घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गजानन काशिनाथ अंधारे यांच्याकडून घेतलेली खरेदी ही १६०० चौ.फुट एवढया प्लॉटची आहे. मी खरेदी बघीतली नसल्यामुळे हे सांगू शकत नाही की, पुढे असे लिहीलेले आहे की, जरी खरेदी ही १६०० चौ.फुटाची असली तरी प्रत्यक्षात १३१६ चौ.फुट जागेबाबत खरेदी आहे. हे मला माहित नाही की, माझ्या काकाने घेतलेल्या जागेमध्ये सुध्दा प्रत्य क्षात १२६९ चौ.फुट जागा असल्याचे नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या संडास बाथरूमच्या मागच्या साईडला गैरअर्जदार यांचे खिडकी दरवाजे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३.१२.२०१४ रोजी खोदकाम करीत असताना गैरअर्जदार व त्यांच्या मुलींने अडविल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व काकावर गैरअर्जदार यांनी फौजदारी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कारणावरून फौजदारी प्रकरण दाखल केले व त्यानंतर आमच्यात व गैरअर्जदार आमच्यामध्ये काहीही घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलट तपास संपला. फेरतपास नाही.</u>

श्रावणोत्तर स्विकृत

(प्रसाद एस.ठाकरे)
दि. १३.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर